198

# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई

जा.क्र.मप्रनि/आस्था/का- /ब-१२६५
कल्पतरु पॉईंट, ४ था माळा,
सायन माटुंगा स्किम रोड क्र.८,
सायन सर्कल समोर, सायन (पूर्व)
मुंबई: ४०० ०२२.

दिनांक: १४/१०/२०११

प्रति,
भांडार अधीक्षक,
भांडारशाखा,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
मुख्य कार्यालय, मुंबई

विषय: मंडळाच्या सभागृहामध्ये होणाऱ्या बैठकींची नोंद नोंदवहीमध्ये ठेवण्याबाबत

विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, मंडळाच्या कार्यालयातील सभागृहामध्ये वेगवेगळया विभागांच्या त्याचबरोबर State Level Expert Appraisal Committee च्या बैठका होतात. कोणत्या दिवशी कोणती बैठक झाली, या संदर्भातील माहिती उपलब्ध होण्यासाठी एक नोंदवही भांडारशाखेत ठेवणे आवश्यक आहे. या संदर्भात आपणास यापूर्वी बऱ्याच वेळा मौखिक सूचना देऊनही अशाप्रकारची नोंदवही ठेवल्याचे माझ्या निदर्शनास आलेले नाही.

तरी या संदर्भात पुन्हा कळविण्यात येते की, दिनांक १७/१०/२०११ पासून मंडळाच्या सभागृहामध्ये होणाऱ्या सर्व बैठकींच्या संदर्भातील इत्यंभुत माहिती दर्शविणारी नोंदवही ठेवण्यात यावी. त्याचबरोबर ज्या विभागाच्या बैठका आयोजित केल्या जाणार आहेत, त्यांच्याकडून प्राप्त झालेल्या मागणीनुसार त्यांना सभागृह रिक्त आहे किंवा नाही, याची माहितीही संबंधीतांना वेळोवेळी लेखी दयावी व त्याबाबतची नोंदवही तयार करुन वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांच्याकडे सादर करावी.

( शि. अ. बोनाटे )
वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी

प्रत माहितीसाठी सविनय सादर-
१.मा. अध्यक्ष, म. प्र. नि. मंडळ, मुंबई
२.मा. सदस्य सचिव, म. प्र. नि. मंडळ, मुंबई
प्रत माहितीसाठी-
१. प्रधान वैज्ञानिक अधिकारी/हवा प्रदूषण निवारण अभियंता/जल प्रदूषण निवारण अभियंता
२. सहायक सचिव (तांत्रिक)/मुख्य लेखा अधिकारी/वरिष्ठ विधी अधिकारी
३. प्रभारी विभागीय अधिकारी/ प्रादेशिक अधिकारी, मुख्यालय/प्रकल्प व योजना
४. कार्यकारी अभियंता/सांख्यिकी अधिकारी/

C:\Documents and Settings\Administrator\My Documents\truptі2011\LETTER\internal letter.doc